# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २४/०८/२०२४ (शनिवार) दुपार

---

### अवैधरीत्या मोहाफुल दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक २२/०८/२०२४ रोजी पोस्टे पारशिवनी येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, मौजा सुवरधरा कडून नवेगाव खैरीकडे एक इसम मोसा. क्र. MH-40/CJ-5659 वर मोहाफुल दारूची अवैध वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून पोस्टे पारशिवनी पोलीसांनी मौजा सुवरधरा ते नवेगावखैरी रोडवर मोसा क्र. MH-40/CJ-5659 ने अवैद्यरीत्या दारू वाहतुक करणाऱ्या इसमास नाकाबंदी केली असता **आरोपी नामे– रविंद्र फजितराव मडावी वय २३ वर्ष, रा. बनेरा ता. पारशिवनी जि. नागपुर** याचे ताब्यातील गाडीवरील दोन्ही बोऱ्याची पाहणी केली असता त्यात दोन काळया रंगाच्या रबरी टयुबमध्ये प्रत्येकी ५०/–रू. लिटर प्रमाणे एकुण १०० लिटर मोहाफुल हातभट्टी दारू किंमती ५०००/–रू. व मोसा क्र. MH-40/CJ-5659 किंमती ५०,०००/–रू. असा एकुण ५५,०००/–रू. चा मुद्देमाल मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– स.फौ. देवानंद उकेबोंद्रे पोस्टे पारशिवनी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे पारशिवनी येथे आरोपीविरूद्ध कलम ६५(अ) मदाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे पारशिवनी येथील ठाणेदार पोनि राजेशकुमार थोरात, सफौ गजानन उकेबोंद्रे, देवानंद उकेबोंद्रे, पोअं. पृथ्वीराज चव्हान, राकेश बंधाटे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर